स्वच्छ हवेने फुप्फुसांच्या कार्यक्षमतेत सुधारणा

आरोग्य वार्ता

नवी दिल्ली : लंडनमध्ये राबवलेल्या 'अल्ट्रा लो इमिशन झोन' (यूएलईझेड) या प्रदूषण नियंत्रण योजनेमुळे लहान मुलांच्या फुप्फुसांची वाढ अधिक चांगल्या प्रकारे होत असल्याचे एका संशोधनातून समोर आले आहे.

'द लॅन्सेट' या नियतकालिकात यासंदर्भातील अभ्यास प्रसिद्ध झाला आहे. शहरी भागातील वाहनांचे प्रदूषण कमी केल्यास मुलांच्या फुप्फुसांची वाढ वेगाने होऊन त्यांची श्वसन क्षमता सुधारू शकते, असे हा अभ्यास स्पष्ट करतो.

किशोरावस्थेत फुप्फुसांची क्षमता कमी राहिल्यास श्वासोच्छ्वासाचा व इतर गंभीर आजार होण्याचा धोका वाढतो. हे स्पष्ट करण्यासाठी संशोधकांनी ६ ते ९ वर्षे वयोगटांतील ३,४०० हून अधिक मुलांचे सलग ५ वर्षे निरीक्षण केले. एप्रिल २०१९ मध्ये लंडनमध्ये 'यूएलईझेड' लागू होण्यापूर्वी आणि नंतर मुलांच्या फुप्फुसांची कार्यक्षमता व त्यांच्या घराभोवतालच्या हवेच्या गुणवत्तेची तपासणी करण्यात आली. याची तुलना करण्यासाठी लंडनमधील ल्युटन शहराची निवड केली होती.

वाहनांचे प्रदूषण कमी करणाऱ्या उपाययोजनांमुळे लहान मुलांना त्यांच्या वाढीच्या वयात उत्तम आरोग्य मिळू शकते. त्यामुळे जगभरातील शहरांनी अशा स्वच्छ हवा निर्माण करणाऱ्या योजनांची लवकरात लवकर आणि व्यापक अंमलबजावणी करावी, असा सल्ला संशोधकांनी दिला आहे.



मनपाच्या भूखंडावर महिलांसाठी व्यायामशाळा

महिला व बालकल्याण समितीची आज पहिली सभा

लोकसत्ता प्रतिनिधी

अहिल्यानगर : महापालिकेच्या महिला व बाल कल्याण समितीची पहिली सभा उद्या, सोमवारी आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी उपलब्ध २.५५ कोटींच्या तरतुदीमधून महिला व बाल कल्याण कार्यक्रमांसाठी विविध योजना व कामांचे नियोजन करण्यात येणार आहे. यात शहरातील महिलांच्या आणि मुलांच्या आरोग्याला तसेच मनोरंजनाला या नियोजनात प्राधान्य देण्यात आले आहे.

शहरातील विविध मोकळ्या जागांवर महिलांसाठी खुल्या व्यायामशाळेचे साहित्य बसविण्यासाठी ३४ लाख ४५ हजार रुपयांचा खर्च प्रस्तावित केला आहे. मोकळ्या जागांवर लहान मुलांसाठी खेळणी साहित्य बसविण्याकरिता ३४ लाख ५० हजार रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे. याशिवाय प्रभाग क्रमांक १ मध्ये महिला व बालकांसाठी व्यायामशाळा आणि अंगणवाडी केंद्र उभारण्यासाठी २० लाख रुपयांच्या निधीतून कामे प्रस्तावित केली जाणार आहेत.

बचत गटांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ मिळवून देण्यासाठी विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. प्रभाग क्रमांक २ मधील पाइपलाइन रस्त्यालगत महापालिकेच्या जागेत, महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंच्या विक्रीसाठी २० लाख रुपये खर्चून स्वतंत्र विक्री केंद्र उभारण्याचा प्रस्ताव आहे.

विनामोबदला खाट

आरोग्य आणि सामाजिक कल्याणाच्या दृष्टीनेही, अर्धांगवायू झालेल्या आणि अंथरुणाला खिळून असलेल्या गरजू महिला रुग्णांना आरोग्य केंद्रामार्फत विनामोबदला खाट उपलब्ध करण्यासाठी ५ लाखांची तरतूद प्रस्तावित आहे. महिला व बाल कल्याण विभागाची सर्व माहिती नागरिकांना मिळण्यासाठी महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्याचा प्रस्ताव सभेपुढे मांडला जाणार आहे.

motilal oswal Home Finance

मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: मोतीलाल ओसवाल टॉवर, रहिमतुल्ला सयानी रोड, परळ एसटी डेपोसमोर, प्रभादेवी, मुंबई - 400 025,
सीएस: 8291889898 वेबसाईट: www.motilaloswalhf.com, ईमेल : hfquery@motilaloswal.com

ताबा सूचना (स्थावर मालमत्तेसाठी)
(सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या नियम 8 (1) अंतर्गत)

ज्याअर्थी मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड (आधी अस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लि., म्हणून ओळखले जाणारे) यांचे अधिकृत अधिकारी म्हणून निम्नस्वाक्षरीकार यांनी, सिक्युरिटायजेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 (54, 2002) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या नियम 3 सहवाचता कलम 13 (12) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना नोटीसमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड सदर ही नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत करण्यासाठी खालील कर्जदारांना बोलावण्यासाठी येथे नमूद केलेली डिमांड नोटीस जारी केली होती.
खालील कर्जदार रक्कम परत करण्यात अयशस्वी झाले आहेत, याद्वारे खालील कर्जदारांना आणि सर्वसाधारणपणे जनतेला सूचना देण्यात येत आहे की, निम्नस्वाक्षरीकार यांनी सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या नियम 8 सहवाचता कायद्याच्या कलम 13 च्या उपकलम (4) अंतर्गत त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तांचा येथे नमूद केलेल्या तारखेला ताबा घेतला आहे.

अ. क्र.	कर्ज करार क्र. / कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदार यांचे नाव	मागणी सूचनेची तारीख आणि थकबाकी	ताब्यात घेतल्याची तारीख	स्थावर मालमत्तेचे वर्णन: मालमत्तेचा पत्ता असलेले मालमत्तेचे ते सर्व तुकडे आणि पार्सल
1	एलएक्सएसएचआर00316-170042491/ एलएक्सएमओएचओएफ221-220584233 / कर्जदार: रामनाथ मारुती कंथाली सह-कर्जदार: मनीषा रामनाथ कंथाली	दि. 10-11-2023 रु. 10,89,165/- यासाठी	27-08-2026	गट क्र. 67/11, येथे पोस्ट- सुसारे, ता-पाथर्डी, जि. अहमदनगर, महाराष्ट्र - 414505, द्वारे सीमाबद्ध:- पूर्व- शिवनाथ आबाजी कंथाली यांचे घर, पश्चिम- अरुण भानुदास कंथाली यांचे घर, उत्तर- गट क्र. 67/11 भाग, दक्षिण- रोड आणि वसंत मारुती कंथाली यांचे घर.

विशेषतः कर्जदाराला आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे मालमत्तेचा व्यवहार न करण्याबाबत सावध केले जाते आणि मालमत्तेचा कोणताही व्यवहार हा वर नमूद केलेल्या रकमेसाठी आणि त्यावरील व्याजासाठी मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड यांच्या शुल्काच्या विषयाधीन असेल. सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी, उपलब्ध वेळेनुसार, निर्देशित कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे कर्जदाराचे लक्ष वेधले जात आहे.
भाषांतरामध्ये त्रुटी आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरण्यात येईल.
दिनांक: 31.08.2026 / ठिकाण: महाराष्ट्र
सही/-, अधिकृत अधिकारी, (मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड)

Hinduja Housing Finance Limited

हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड
कॉर्पोरेट कार्यालय 167-169, 2रा मजला, लिटल माउंट, सैदापेट, चेन्नई – 600015. (तामिळनाडू).
ई-मेल आयडी: auction@hindujahousingfinance.com

ई-लिलाव सह विक्रीसाठी सार्वजनिक सूचना (परिशिष्ट- IV A) (नियम 9(1) & 8(6)

हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (HHF), **कॉर्पोरेट कार्यालय, १६७-१६९, दुसरा मजला, लिटल माउंट, सैदापेट, चेन्नई – ६०००१५. (तामिळनाडू) आणि शाखा कार्यालय:हिंदुजा हाउसिंग फायनान्स लिमिटेड माणिकचंद गॅलरला बिल्डिंग, पहिला मजला, दीप बंगला चौक, सेनापती बापट रोडकडे, पुणे महाराष्ट्र-411016 येथे.** यांचेकडे तारण असलेल्या **अचल मालमत्तेची सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल असेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२** (यापुढे "अधिनियम") अंतर्गत विक्री. ज्याअर्थी, HHFL च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी पुढील कर्ज खात्यांमध्ये सदर अधिनियमातील अनुच्छेद १३(२) अंतर्गत जारी केलेल्या सूचनांच्या अनुषंगाने पुढील मालमत्तांचा **सांकेतिक ताबा** घेतलेला आहे. ही विक्री **https://www.bankauction.com** या वेबसाईटवर दिलेल्या ई-लिलाव मंचाच्या माध्यमातून करण्यात येईल.

मालमत्तेची तपासणीची तारीख	बयाना रक्कमेची दिनांक	ई-लिलाव दिनांक / वेळ
05-09-2026 11.00 तास -14.00 तास	05/10/2026 सायंकाळी 5 वाजेपर्यंत.	06/10/2026 11:00 तास-13:00 तास

अ. क्र	कर्जदार / सह-कर्जदार / हमीदार / कर्ज खाते क्र.	अचल मालमत्तेचे वर्णन / सुरक्षित संपत्ती	ताबा दिनांक	आरक्षित किंमत
1.	सौ. तेजस्वी कालोखे (कर्जदार), श्री. पंकज कालोखे (सह-कर्जदार), MH/AMD/AMDR/A000000334	मालमत्तेचा सर्व भाग आणि तुकडा प्लॉट नं. 61 चा एकूण एरिया 0.78 एकर (म्हणजेच 78 चौ.मी) त्या बरोबरच सर्व नं. 256 / 2बी नगर गाव मौजे देवळे अहमदनगर निवासी संरचनेसह बांधलेला प्लॉट नं. 61 चा एकूण बिल्डअप एरिया 36.12 चौ.मी चतुर्सिमा - पुर्वेस : 4.5 मी रुंद रस्ता, दक्षिण: 9 मी रुंद रस्ताए पश्चिम: खुली जागा, उत्तर: प्लॉट नं. 60.	09-02-2026 सांकेतिक या दिनांकास एकूण थकबाकी रु. 1009946/- 10 ऑक्टोबर 2025 पर्यंत	रु. 21,10,400/-
	बोली वाढीव रक्कम: रु. 10,000/- (रुपये दहा हजार फक्त)			बयाना रक्कम रु. 2,11,040/-

अधिक तपशील आणि चौकशीसाठी **प्राधिकृत अधिकारी, हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, श्री.रुषिकेश उभाळे- 9823244498 श्री. विक्रम नलावडे – 9405020251, श्री. रितेश गवई – 9011858221, श्री. गणेश पाटील – 9372403099.यांचेशी संपर्क साधावा.**
टीप: अटी व शर्तींबाबत अधिक माहितीसाठी कृपया संकेतस्थळाला भेट द्या: https://www.bankauction.com
स्थान: पुणे , दिनांक: 31-08-2026
प्राधिकृत अधिकारी, हिंदुजा हाउसिंग फायनान्स लि.

पावसाची ओढ; खरिपाला फटका

मका, सोयाबीन, मूग, उडीद पिकांचे उत्पादन घटण्याची भीती

लोकसत्ता प्रतिनिधी

अहिल्यानगर : जिल्ह्यात पावसाने ओढ दिल्याने खरिपातील मका, सोयाबीन, मूग, उडीद यांसारख्या पिकांच्या वाढीवर प्रतिकूल परिणाम झाला असून या पिकांच्या उत्पादनात घट येण्याची शक्यता कृषी विभागाने वर्तवली आहे. शेवगाव, पाथर्डी, नेवासा, राहुरी, श्रीरामपूर या भागात सरासरीच्या तुलनेत आतापर्यंत निम्माच पाऊस झाला आहे.

शेतकऱ्यांनी आता रब्बी हंगामाची तयारी सुरू केली आहे. जिल्ह्याच्या अनेक भागात कृष्णाष्टमीच्या मुहूर्तावर ज्वारीची पेरणी सुरू होते. कांदा, हरभरा, ज्वारी या पिकांकडे शेतकरी वळतील. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आता परतीच्या पावसाकडे लक्ष लागलेले आहे. विशेषतः दक्षिण भागात अनेकवेळा परतीच्या पावसाने शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे.

पावसाळ्याच्या सुरुवातीला 'एल निनो'च्या पार्श्वभूमीवर चिंता व्यक्त केली जात होती. मात्र जिल्ह्यात पावसाला सुरुवात झाली, धरणांच्या पाणलोटात चांगला पाऊस झाला, त्यामुळे धरणे भरली, ओसंडून वाहू लागली. मात्र झालेला पाऊस जिल्ह्यात असमान स्वरूपाचा आहे. काही मोजक्या तालुक्यात पावसाने सरासरी ओलांडली मात्र अनेक भागात कमी पाऊस झालेला आहे. याशिवाय पावसामध्ये खंडही पडलेला आहे.

कृषी विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार जिल्ह्यात खरीप हंगामाचे सरासरी ७ लाख १६ हजार २०८ हेक्टर क्षेत्र आहे. त्यापैकी एकूण ७ लाख ९ हजार २७१ हेक्टर (९९ टक्के) क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी झाली. अकोल्यात भात पीक सध्या वाढीच्या अवस्थेत असले तरी पावसाची नितांत आवश्यकता आहे.

जिल्ह्यातील पाऊस

जिल्ह्यात आतापर्यंत पडलेला तालुकानिहाय पावसाची टक्केवारी पुढीलप्रमाणे : पाथर्डी ५९.४, राहुरी ४०.६, अहिल्यानगर ७७.४, शेवगाव ५८, नेवासा ५८.९, श्रीरामपूर ५२.८, राहाता ६७.६, पारनेर १००.८, श्रीगोंदा ११२.८, कर्जत ११०.९, संगमनेर ९९.९, अकोले १६२.४, कोपरगाव ९९.२. एकूण ८७.६ टक्के.

१२ हजार शेततळी

ज्या ठिकाणी संरक्षित सिंचनाचे पाणी उपलब्ध आहे, शेततळी आहेत अशा सुमारे ५० हजार हेक्टरवरील खरीप पिकांची अवस्था तुलनेत चांगली आहे. जिल्ह्यात १२ हजारांवर शेततळी आहेत.

AUTHUM

ऑथम इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय : 707, रहेजा सेंटर, फ्री प्रेस जर्नल रोड, नरिमन पॉइंट, मुंबई - 400 021.
फोन : (022) 6747 2117 **फॅक्स :** (022) 6747 2118 **ई-मेल : info@authum.com**

परिशिष्ट - IV-A [नियम 8 (6) ची तरतूद पहा] | ई-लिलाव सह विक्रीसाठी जाहीर सूचना (परिशिष्ट -IV A) (नियम 8(6))

रिलायन्स होम फायनान्स लिमिटेड (आरएचएफएल) च्या धनको यांनी तणावग्रस्त मालमत्तेच्या निराकरणासाठी प्रुडेंशियल फ्रेमवर्कवरील **दि. 7 जून 2019** दिनांकीत आरबीआय परिपत्रक च्या अनुषंगाने, **3 मार्च 2023** रोजी माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने आणि **25 मार्च 2023** रोजी भागधारकांनी पारित केलेल्या विशेष ठरावानुसार, **आरएचएफएल** ने आपला व्यवसाय घसरणीच्या आधारावर **रिलायन्स कमर्शियल फायनान्स लिमिटेड** (यापुढे "**आरसीएफएल**" म्हणून संदर्भित) यांच्याकडे हस्तांतरित करण्याचा करार केला आहे आणि कर्जदाराच्या कर्ज खात्याशी संबंधित सर्व अधिकार आणि दायित्वे देखील **आरसीएफएल** कडे हस्तांतरित केली गेली आहेत.
ऑथम इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (''एआयआयएल'') (एनसीएलटी च्या **10.05.2024** रोजीच्या आदेशानुसार रिलायन्स कमर्शियल फायनान्स लिमिटेड (**''आरसीएफएल''**) कडून **एआयआयएल** मध्ये कर्ज व्यवसायाचे विलगीकरण झालेली परिणामी कंपनी) **कॉर्पोरेट कार्यालय :** रुबी 11वा मजला, नॉर्थ-वेस्ट विंग, प्लॉट क्र. 29, सेनापती बापट मार्ग, दादर (पश्चिम), मुंबई - 400028 आणि **शाखा कार्यालय :- ऑथम इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड,** ऑफिस क्र. 209 आणि 210, दुसरा मजला, सिटी स्क्वेअर, प्राइड हॉटेल जवळ, शिवाजी नगर, पुणे - 411005 येथे असून, यांच्याकडे तारण असलेल्या स्थावर मालमत्तेची सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 (यापुढे "कायदा") अंतर्गत विक्री. ज्याअर्थी, **ऑथम इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड** चे प्राधिकृत अधिकारी (**''एओ''**) यांनी खालील कर्ज खाती / संभाव्य क्रमांक मध्ये कायद्याच्या कलम 13(2) अंतर्गत जारी केलेल्या सुचनेच्या अनुषंगाने खालील **मालमत्तेचा ताबा घेतला होता,** त्यासोबतच **ऑथम इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड** च्या थकबाकीच्या वसुलीसाठी **''जशी आहे जेथे आहे आणि तेथे जे काही आहे''** तत्त्वावर विक्री करण्याचा देखील त्यांना अधिकार आहे. सदर विक्री **https://sarfaesi.auctiontiger.net** या वेबसाइटवर प्रदान केलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे खालील स्वाक्षरीकार यांच्या मार्फत केली जाईल.

कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदार	मागणी सूचना दिनांक आणि रक्कम	प्रत्यक्ष ताबा दिनांक	राखीव किंमत / बयाणा रक्कम ठेव
कर्ज खाते क्र. RHHLPUN000017415 आणि RHHTPUN000018038 आणि RHHTPUN000022766 शाखा : पुणे 1. रेणुका मनोहर अनमल 2. मनोहर चंद्रय्या अनमल	25 नोव्हेंबर 2021 आणि रु. 46,45,810/- (रुपये शेहेचाळीस लाख पंचेचाळीस हजार आठशे दहा फक्त) दि. 24-11-2021 रोजी देय झाले आहे. बोली वृद्धी : रु. 30,000/- (रुपये तीस हजार फक्त)	11 नोव्हेंबर 2025 एकूण थकबाकी दि. 22 ऑगस्ट 2026 रोजी नुसार रु. 50,41,967.99/- (रुपये पन्नास लाख एक्केचाळीस हजार नऊशे सदुसष्ट फक्त)	रु. 64,00,000/- (रुपये चौसष्ट लाख फक्त) बयाणा रक्कम ठेव (ईएमडी) : रु. 6,40,000/- (रुपये सहा लाख चाळीस हजार फक्त)

स्थावर मालमत्ता / सुरक्षित मालमत्तेचे वर्णन : पुढील स्थावर मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, फ्लॅट क्र. टी-14, स्टिल्ट तिसरा मजला, ब्लॉक बी, रिद्धी सिद्धी अपार्टमेंट, प्लॉट क्र. 23 24, सर्व्हे क्र. 94, सावेडी, अहमदनगर, महाराष्ट्र 414003.

पाहणीचा दिनांक :	ईएमडी शेवटची दिनांक :	ई-लिलावाची दिनांक / वेळ :
03 ऑक्टोबर 2026, 11:00-16:00	08 ऑक्टोबर 2026, सायं. 05:00 पर्यंत	09 ऑक्टोबर 2026, 11:00-13:00.

पेमेंटची पद्धत :- सर्व पेमेंट डिमांड ड्राफ्टद्वारे ''ऑथम इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड'' च्या नावे पुणे येथे देय असेल किंवा आरटीजीएस / एनइएफटी द्वारे करिता खात्यांचे तपशील खालीलप्रमाणे आहेत : अ) खात्याचे नाव :- ऑथम इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड सीएचडी खाते, ब) बँकेचे नाव :- एचडीएफसी बँक लि., क) खाते क्र. :- 99999917071983, ड) आयएफएससी कोड : HDFC0001119.

ऑनलाइन ई-लिलाव विक्रीच्या अटी आणि शर्ती
1. मालमत्तेची विक्री **''जशी आहे जेथे आहे आणि तेथे जे काही आहे आणि कोणत्याही आधाराशिवाय''** या तत्वावर केली जात आहे. कारण अशी विक्री कोणत्याही प्रकारच्या वॉरंटी आणि नुकसानभरपाई शिवाय असणार आहे.
2. तपशिल, मदत, कार्यपद्धतीसाठी आणि ई-लिलावाच्या ऑनलाइन बोलीसाठी संभाव्य बोलीदार सेवा प्रदाता **मे. ई-प्रोक्योरमेंट टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड (ऑक्शनटायगर), बी-705, वॉल स्ट्रीट II, ओरिएंट क्लबसमोर, गुजरात कॉलेजजवळ, एलिस ब्रिज, अहमदाबाद - 380 006 गुजरात (संपर्क क्र. 9265562818 / 9265562821/19) यांच्याशी संपर्क साधू शकतात. सपोर्ट ईमेल - support@auctiontiger.net, श्री. राम शर्मा, मो. 8000023297 ईमेल : ramprasad@auctiontiger.net**
3. **अधिक तपशील आणि प्रश्नांसाठी, प्राधिकृत अधिकारी - संदीप ठाकूर - (मो : 9881881799) यांच्याशी संपर्क साधा.**
4. **वर नमूद केलेल्या तारखेला / ठिकाणी ई-लिलाव विक्री असण्याबद्दल उक्त कर्जाचे कर्जदार / गहाणदार / जामीनदार यांना सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, 2002 च्या नियम 8(6) अंतर्गत 30 (तीस) दिवसांची सूचना म्हणून देखील हे मानले जाऊ शकते.**
कृपया तपशीलवार अटी आणि नियमांसाठी वेबसाइट पहा (कोड : 375429 वापरा आणि एनआयटी दस्तऐवज पहा) (https://sarfaesi.auctiontiger.net)
ठिकाण : पुणे / दिनांक : 31.08.2026
स्वा./- प्राधिकृत अधिकारी

साईबाबा संस्थान कर्मचारी सोसायटीच्या सभेत खडाजंगी

लोकसत्ता वार्ताहर

राहाता : शिर्डी येथील साई संस्थानच्या श्री साईबाबा संस्थान कर्मचारी सहकारी सोसायटीच्या वार्षिक सभेत साईज्योत इमारतीचे रखडलेले काम आणि शहरात नवीन जागा खरेदीच्या विषयावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी झाली.

जुन्या संचालक मंडळातील काही सदस्य व आजी-माजी अध्यक्षांनी या विषयावर आक्षेप घेत गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला. मात्र, संस्थेचे अध्यक्ष विठ्ठल पवार यांनी विरोधकांचे आरोप खोडून काढत संस्थेचा आढावा मांडला. साई संस्थान सोसायटीची वार्षिक सभा संस्थेचे अध्यक्ष विठ्ठल पवार यांच्या अध्यक्षतेखाली झाली. उपाध्यक्ष पोपट कोते यांच्यासह आजी-माजी संचालक व सभासद उपस्थित होते. सभेच्या सुरुवातीलाच विरोधी मंडळाने साईज्योत इमारतीचा मुद्दा ऐरणीवर घेतला. २०१४ पासून रखडलेल्या या इमारतीचे काम अद्याप का पूर्ण झाले नाही आणि चौकशीच्या फेऱ्यात अडकलेल्या या वास्तूऐवजी संस्थेसाठी शहरात नवीन जागा घेण्याचा प्रस्ताव का मांडला जात आहे, असा प्रश्न उपस्थित केला. उर्वरित जागेत ५० लाख रुपयांत २००० चौ. फूट जागेत नवीन कार्यालय ६ महिन्यांत उभे करता येऊ शकते, असा पर्याय विरोधकांनी मांडला. तसेच ५५० सभासदांच्या स्वाक्षऱ्यांचा हवाला देत नवीन जागा खरेदीला विरोध केला. सत्ताधारी मंडळाने ५५० सह्यांचा दावा करणाऱ्या विरोधकांपैकी प्रत्यक्षात केवळ ७ ते ८ जणच विरोध करीत आहे.

साईभक्तांना अवघ्या १० रुपयांत १ लिटर आणि २० रुपयांत २ लिटर थंड पाण्याची बाटली उपलब्ध करून दिली जाणार आहे तर माजी संचालकांच्या फायद्यासाठी चालणारे पिशव्यांचे गैरव्यवहार बंद करून नियमानुसार १२० मायक्रॉनच्या पीओपी बॅगचा वापर सुरू केला.
-विठ्ठल पवार, अध्यक्ष, साईबाबा संस्थान कर्मचारी सोसायटी, शिर्डी

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यावरून राजकारण

संगमनेरमध्ये जागेचा विषय चर्चेचा

लोकसत्ता वार्ताहर

संगमनेर : शहरात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याचा प्रश्न कळीचा राजकीय मुद्दा बनला आहे. नगरपालिकेच्या मागणीनुसार परिवहन विभागाने बसस्थानक आवारातील जागा पुतळा उभारण्यासाठी पालिकेला देऊ केली. मात्र ही जागा अत्यंत तुटपुंजी असून छत्रपतींच्या कर्तृत्वाला साजेसे भव्य स्मारक होण्यासाठी आम्ही आणखी मोठी जागा मिळवू, असा दावा आमदार खताळ समर्थक करत आहेत.

माजी नगराध्यक्ष, विद्यमान नगरसेवक दिलीप पुंड यांनी वाढीव जागेला मान्यता देणारी खाती दीड वर्ष तुमच्याकडेच असूनही मान्यता मिळाली नाही, आता चालू कामात खोडा घालू नका, असा इशारा दिला आहे. शहरात छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा असावा अशी नागरिकांची जुनीच मागणी आहे. स्मारकासाठी २०१८ मध्ये तत्कालीन नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे यांच्या कार्यकाळात नगरपालिकेने ठराव केला. त्यानंतर बसस्थानक परिसरात जागा मिळावी यासाठी पाठपुरावा सुरू होता. दरम्यान, २०२३ मध्ये आमदार सत्यजित तांबे यांनी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन बसस्थानक परिसरात शिवस्मारक उभारण्यासाठी जागेची मागणी केली. त्याला सकारात्मक प्रतिसाद देत ६ मीटर बाय ४ मीटर जागा स्मारकासाठी देण्यास मान्यता देण्यात आली.

याबाबत आमदार तांबे म्हणाले, २०१८ पासून स्मारकासाठी पाठपुरावा सुरू आहे. अतिरिक्त जागेचा प्रस्ताव एसटी महामंडळाच्या विचाराधीन असल्याने आणखी किती काळ थांबायचे, हा प्रश्न होता. त्यामुळे उपलब्ध झालेल्या जागेत स्मारकाचे काम सुरू करण्याचा निर्णय घेतला. यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण केली असून पुतळ्याची निविदा प्रक्रियाही अंतिम टप्प्यात आहे.

स्मारकासाठी आवश्यक असलेल्या वाढीव जागेचा प्रश्न गेल्या दीड वर्षांपासून प्रलंबित आहे. या काळात परिवहन तसेच नगरविकास खाते आपल्याच ताब्यात असतानाही संबंधितांकडून हा प्रश्न मार्गी का लावण्यात आला नाही? ही दोन्ही महत्त्वाची खाती हातात असताना, स्मारकासाठी आवश्यक वाढीव जागेचा विषय शासनस्तरावर सोडवण्यासाठी पुरेसा कालावधी आणि संधी उपलब्ध होती. तरीही हा प्रश्न प्रलंबित राहिला, याचे उत्तर आधी त्यांनी संगमनेरकरांना दिले पाहिजे.
- दिलीप पुंड, नगरसेवक

BPHE Society's
INSTITUTE OF MANAGEMENT STUDIES, CAREER DEVELOPMENT & RESEARCH (IMSCDR)
(A Christian Minority Institution)
(Affiliated to Savitribai Phule Pune University & Approved by AICTE)
Station Road, Ahilyanagar – 414001

Applications are invited for the **Post of Director (Full-Time, Open Category)** for BPHE Society's Institute of Management Studies, Career Development and Research (IMSCDR), Ahilyanagar.

Essential Qualifications:
- Ph. D. degree and First Class or equivalent at either Bachelor's or Master's level in the relevant branch
- At least two successful Ph.D. guided as supervisor / Co-Supervisor and minimum 8 research publications in SCI journals / UGC / AICTE approved list of journals.
- Minimum 15 years of experience in teaching / research/ industry, out of which at least 3 years shall be at the post equivalent to that of Professor.

General Information:
- Age, Qualifications and pay scale shall be as per AICTE/SPPU/BPHES Norms applicable from time to time.
- Candidates who are in service should send their applications through proper channel or submit a No Objection Certificate (NOC) from the present employer at the time of interview.
- No TA/DA will be payable to candidates appearing for the interview.
- Applications along with photocopies of all relevant documents should reach the following address within 30 days from the date of publication of this advertisement: The Chairman/Secretary, BPHE Society, Biz Bay One, 1st Floor, Above Zudio Store, Station Road, Ahilyanagar – 414001.
E-mail: bphes.anr@gmail.com
- Qualified Persons with Disabilities (PwD) candidates may also apply.

Vishal Barnabas Secretary BPHES
Dr. R. J. Barnabas Chairman, BPHES

स्थावर मालमत्ता ताबा घेण्याबाबतची नोटिस
नमुना 'झेड'
(नियम १०७ पोट नियम (११ (ड-१) पहा)

ज्याअर्थी खाली सही केलेले वसुली अधिकारी पारनेर तालुका सैनिक सहकारी बँक लि. पारनेर, जि. अहिल्यानगर महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये असून, मागणीची नोटिस ऋणको यांना देऊन नोटिसीमध्ये नमुद केलेली रक्कम सदर नोटिस मिळाल्याच्या दिनांकापासून आणि ऋणको याने रक्कम जमा करण्यास कसूर केली आहे. खाली सही करणाऱ्याने जप्तीची नोटिस दिली असून, पुढे निर्दिष्ट केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे ऋणकोला याप्रमाणे नोटिस देण्यात येत आहे आणि सर्व नागरिकांना खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्याला / तिला महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ मधील नियम १०७ (११ (ड-१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार जप्त केलेले आहे. विशेष करून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येत आहे की, मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास पारनेर तालुका सैनिक सहकारी बँक लि. पारनेर जि. अहिल्यानगर यांच्या बोजाची रक्कम आणि होणारे व्याज याला अधिन राहावे लागेल.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

अ. क्र.	थकबाकीदारांचे नाव	थकबाकी रक्कम	नोटिस दिनांक	गावाचे नाव	गट नं./ भुमापन / क्र.	क्षेत्र हे. आर. चौ.मी.
१	कर्जदार : सोहेल गौस मोहम्मद सय्यद जमीनदार :- शकिल गौसमोहम्मद सय्यद	दावा रक्कम ४६१००४३/- दि. १७.३.२०२२ पासून १४% व्याज + इतर खर्च	मागणी नोटिस दि. २५.४.२०२२ जप्ती पूर्वी नोटिस दि. २०.२.२०२५ जप्ती आदेश दि. १८.१२.२०२४	पारनेर ता.पारनेर जि. अ. नगर	४११९	०.१०.००
					३९७९	०.२९.००
२	कर्जदार : संजय शंकर खंदारे	दावा रक्कम २०५८३२६/- दि ०४.१२.२०२५ पासून १३% व्याज + इतर खर्च	मागणी न